परिपत्रक नं. 32
(जनरल विभाग)

रयत शिक्षण संस्था, सातारा
दि. ०६/०९/२०१९

सर्वश्री शाखाप्रमुख,
रयत शिक्षण संस्था,

यांना ......

विषय - **'कर्मवीर भाऊराव पाटील' चरित्र ग्रंथाबाबत.**

**'कर्मवीर भाऊराव पाटील'** या डॉ.अंजिलवेल मॅथ्यू यांनी लिहिलेल्या आणि वि.स.वाळिंबे यांनी मराठीत अनुवादित केलेल्या चरित्र ग्रंथाची तिसरी आवृत्ती प्रकाशित झालेली आहे.

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केलेल्या अलौकिक कार्याची माहिती सर्वांना व्हावी म्हणून सदरचा चरित्र ग्रंथ प्रत्येक शाखेत असणे गरजेचे आहे. शिवाजी विद्यापीठाने सदरचा ग्रंथ बी.ए.भाग-२ या वर्गाला मराठी विषयाच्या अभ्यासक्रमात समाविष्ठ केलेला आहे. शाखेसाठी, शाखेत होणा-या समारंभप्रसंगी पाहुण्यांना पुष्पगुच्छ व शाल देण्याऐवजी सदरचा अनमोल ग्रंथ भेट देता यावा म्हणून संस्थेने तो मुख्य कार्यालयात आणि विभागीय कार्यालयात रु.५००/- या किंमतीस सर्वांसाठी विक्रीस ठेवलेला आहे.

तरी विद्यालयांनी कमीतकमी दोन व महाविद्यालयांनी कमीतकमी पाच प्रती आपल्या ग्रंथालयात विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी उपलब्ध करुन द्याव्यात. तसेच सदरचे परिपत्रक विद्यार्थी व सेवक यांच्याही निदर्शनास आणून **'कर्मवीर भाऊराव पाटील'** या चरित्र ग्रंथाबाबतची सविस्तर माहिती त्यांना द्यावी.

रयत शिक्षण संस्था सातारा

सचिव,
रयत शिक्षण संस्था, सातारा

**प्रत माहितीसाठी रवाना -**
१. सर्वश्री विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था
२ अकौंट विभागप्रमुख, कार्यालय, रयत शिक्षण संस्था,सातारा

Letter/ CircularA४- ८४/ ३००८१९